# ''रत्नागिरी जिल्हयातील डेरवणच्या शिवसृष्टीचा ऐतिहासिक मागोवा''

प्रा.अजय श्रीपती पाटील संशोधक विद्यार्थी,इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
डॉ. एस.पी. शिंदे मार्गदर्शक एस.जी.एम. कॉलेज, पंढरपूर

**प्रस्तावना:**

रत्नागिरी जिल्हयाने अनेक भारतरत्ने दिलेले आहेत. यामध्ये वीरपुरुष, साहित्यिक, स्वातंत्र्यसेवक आणि समाजसेवक आहोत. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, एस.एम. जोशी, हदयाचे कवी सानेगुरुजी, युगप्रवर्तक कवी केशवसूत, लोकसभेचे भुतपूर्व अध्यक्ष कै. दादासाहेब माळवणकर पुर्वीच्या मुंबई राज्याचे प्रथम मुख्यमंत्री बाळासाहेब खेर, अलिकडे क्रिडा क्षेत्रात महनमीय कामगिरी बजावलेले एकनाथ सोलकर, चंद्रकांत पंडीत, गुलाम परकार यांच्यासारखे क्रिकेटपटू, कबडीपटू मधू पाटील, नटश्रेष्ट कै. शंकरराव घाणेकर, कै. काशिनाथ घाणेकर अशी कितीतरी स्फुर्ती देणारी नररत्ने या जिल्हयाने राष्ट्राला दिली आहेत. जिल्हयात जन्म घेतलेल्या अनेक व्यक्तिमत्वांनी पुढे आपल्या कर्तत्वाने अत्तुंग झेप घेतली. त्यापैकी कांहीना भारतरत्न या देशाच्या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरवण्यात आले. अशीच एक महननीय व्यक्ती म्हणजे श्री सुद्गूरु सहजानंद सरस्वती महाराज तथा जोशी होय. लांबी श्री क्षेत्र डेरवणमध्ये शिवसृष्टीच्या रुपाने जे कार्य केले त्याचा आढावा घेण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे. श्री सद्गुरु सहजानंद सरस्वती महाराज यांनी सन १९६९ मध्ये ब्रम्हभूत श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर यांच्या महानिर्वाणानंतर श्री क्षेत्र डेरवण येथे त्यांच्या समाधी मंदिराची उभारणी केली आणि मनाशी भव्य संकल्पाची रुपरेषा आखून 'श्रीमंत सीतारामबुवा वालावलकर ट्रस्ट'ची स्थापना केली.[१] चिपळूणपासून सुमारे १९ कि.मी. अंतरावर जवळजवळ एक कोटी रुपये खर्च करुन श्री सीतारामबुवा वालावलकर ट्रस्टतर्फे छत्रपती श्रीशिवरायांच्या जीवनातील महत्त्वाच्या प्रसगांचं दर्शन घडवणारी 'शिवसृष्टी निर्माण केली आहे.[२] श्री क्षेत्र डेरवण येथील 'शिवसृष्टी' हे येथील प्रमुख पर्यटन केंद्राचे आकर्षण आहे. सदर शिवसृष्टीमध्ये शिवरायांच्या जीवनावरील कांही प्रसंगाच्या शिल्पकृती तयार केल्या आहेत. येथील शिल्पातील कला, रंगसंगती आणि भावनाविष्कार अप्रतिम वाहतात. विशेषत: शिवरायांचा जन्म, अफझलखानाचा वध, शिवरायांचा राज्याभिषेक, शाहिस्तेखानाची फजिती इ. प्रसंगामध्ये जीवंतपणा वाटतो. डेरवण येथे शिवजयंती मोठया प्रमाणावर साजरी केली जाते. तसेच सीतारामपंत वालावलकर यांची पुण्यतिथी मोठया प्रमाणात साजरी करतात. येथील आणखी एक वैशिष्टय म्हणजे वालावलकर ट्रस्टच्यावतीने अनेक समाजोपयोगी कार्यक्रम संपन्न होतात.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित साकारलेली 'शिवसृष्टी' हे श्रीक्षेत्र डेरवण या गांवचे प्रमुख आकर्षक असे पर्यटन केंद्र आहे. या ठिकाणी छ. शिवाजी महाराजांच्या लहानपणापासून ते स्वराज्य स्थापनेपर्यंतचे सर्व प्रसंग कसबीपणाने चितारलेले आहेत.[३] शिवसृष्टीच्या या शिल्पसमुहाला 'शिवसमर्थगड' या नांवाने ओळखले जाते.

श्री सद्गुरु सहजानंद सरस्वती यांच्या मार्गदर्शनाखाली तेथे विविध धार्मिक आणि सामाजिक कार्याची मुहुर्तमेढ रोवली गेली.[४] रत्नागिरी जिल्हयात गोवा—मुंबई राष्ट्रीय महामार्गावरील सावर्डे गांवापासून थोडेसे आत परंतु पूर्वेस ४ कि.मी. अंतरावर श्री क्षेत्र डेरवण आहे. या गांवात कश्यप ऋषिंचा आश्रम असून गांवाजवळून कश्यपी नदी वाहते. या स्थानास पर्यटन नकाशावर स्थान मिळाले आहे. याचे एकमेव कारण म्हणजे येथील शिवसृष्टीची निर्मिती होय.[५]

श्री क्षेत्र डेरवण परिसरात संत परिवारातील श्री सीतारामबुवा वालावलकर यांचे वास्तव्य होते. त्यांच्या मृत्यू पश्चात त्यांच्या नावाने वालावलकर परिवाराने वरील चॅरिटेबल ट्रस्टची स्थापना केली. याच ट्रस्टने शिवसृष्टी निर्माण केली त्याचे सर्व श्रेय शिवप्रेमी कलाकार गणेश पाटकर आणि त्यांचे सहकारी कलाकार यांना जाते. या शिवसृष्टीमधील सर्व मूर्ती सिमेंटच्या आहेत. शिव स्मारकाचे प्रवेशद्वार भव्य व आकर्षक आहे. प्रवेशद्वारावर दोन मोठे हत्ती स्वागतास उभे आहेत. घोडे स्वार व मावळेदेखील आहेत. प्रवेशद्वारातून आत पाऊल टाकताच आपण शिवकाळात असल्याचा भास होतो. कारण शिवकाळातील सर्व प्रसंग अगदी हुबेहुब साकारलेले आहेत. या शिल्पातील कला, रंगसंगती आणि भावनाविष्कार अप्रतिम वाटतात. या विविध प्रसंगातील शिल्पाकृती पाहतांना शिवरायांना इतिहास आपल्या डोळयासमोर उभा राहतो.[६]

आणखीन एक वैशीष्टय म्हणजे या ट्रस्टच्यावतीने अनेक समाजोपयोगी कार्यक्रम केले जातात. तसेच या शिवसृष्टीबरोबर या ट्रस्टने अनेक पुढीलप्रमाणे समाजोपयोगी समाजातील ग्रामीण गोरगरींबांच्यासाठी अन्न—वस्त्र—निवारा यासाठी 'मागेल त्याला काम' ही अभिनव योजना राबवण्यात आली. वर्षातून दोनवेळा गरीब ग्रामस्थांना कपडे, शेतकऱ्यांना गाय, बैल, वैरण, अल्पदरात तेल, साखर, तांदुळ देवू केल्या तर कामगारांच्या मुलांच्या लग्नामध्ये मंगळसूत्र कपडे, रोख सहाय्य पंचक्रोशीत टंचाई ग्रस्त गांवाना टॅकरने पाणीपुरवठा, विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्त्या, मोफत वहया, पुस्तके, शालेय साहित्य गणवेष व शिवाय कुपोषित मुले आणि माता यांचेसाठी सकस आहार योना राबवल्या. शिवाय भक्तश्रेष्ठ कमलाकर ल. वालावलकर रुग्णालय व रोगनिदान केंद्र याद्वारे पुढीलप्रमाणे नेत्रदिपक कार्य केले असे उपक्रम राबवले आहेत.

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत ल. वालावलकर हॉस्पिटल व रोगनिदान केंद्र:**

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टचे भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत ल. वालावलकर हॉस्पिटल व रोगनिदान केंद्र आहे. सदरच्या भागामध्ये गोरगरिब लोकांना वैद्यकीय सुविधा नव्हती. त्यामुळे सदरच्या सुविधाबाबत होणारी गैरसोय, आर्थिक दुर्बलतेपोटी होणारी परवड यामुळे येथील लोकांनी वैद्यकीय सोय व्हावी यासाठी सन १९६९ मध्ये श्री सद्‌गुरु सहजानंदसरस्वती महारांजांनी श्री क्षेत्र डेरवण परिसरात अद्ययावत रुग्णालय उभारण्याचा संकल्प केला. त्यानुसार त्यांनी स्थानाच्या शेजारी असणाऱ्या जमिनीपैकी 'शेरीचा माळ नावाची जमिन विकत घेतली.

सदरचे रुग्णालय संकल्पाचे काम सुरु करत असतांना स्थानिक राजकीय मंडळीकडून खूप त्रास झाला त्यामुळे काही काळ काम थंडावले. बऱ्याच अडचणीवर मात करुन दि. २४ जून १९९५ मध्ये संस्थेचे प्रमुख विश्वस्थ श्री कमजाकरपंत लक्ष्मण वालावलकर यांच्या हस्ते प.पू. भूमिपूजन करण्यात आले. परंतु दुर्देवाने दि. १० सप्टे.१९९५ मध्ये वालावलकर साहेबांचे आकस्मित देहवासन झाले. त्यांच्या निधनामुळे ट्रस्टवर फार मोठा आघात झाला.

वालावलकर साहेबांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी श्रीमती मालतीवहिनी, चिरंजिव श्री विकासराव व स्नुषा सौ. मुक्तावहिनी या त्रिमुर्तीनी दृढनिश्चय करुन पूर्ण केला. दि. १ फेब्रुवारी १९९६ रोजी या रुगणालयाचे नामकरण झाले. श्री वालावरलकर साहेबांची पवित्र स्मृती सर्वाच्या अंत:करणात सदैव जागृती राहावी यासाठी या प्रकल्पाला 'भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत ल. वालावलकर रुग्णालय व रोगनिदान केंद्र' नाव देण्यात आले. हा समारंभ खूप मोठया थाटामाटात संपन्न झाला.

सदरचे रुग्णालय अतिशय सुसज्ज असून सर्व अत्यावश्यक सेवा दिल्या जातात. येथे ७५० कॉट्स, स्त्री—पुरुष व बाल रुग्णांसाठी स्वतंत्र कक्ष, अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज अशी १० ऑपरेशन थिएटर्स, अतिदक्षता विभाग, सुसज्ज येथे हदय शस्त्रक्रिया केल्या जातात. सदरच्या रुगणालयामध्ये बाहय विभागात दररोज शेकडो रुग्णांना वैद्यकीय सेवा दिल्या जातात. येथे कुशल व अनुभवी शल्यविशारद आहेत. येथे अनेक देशी विदेशी उपकरणांचा लाभ सर्वांना मिळतो. शिवाय गोरगरिबासाठी विशेष सवलती दिल्या जातात. रुग्णाच्या नातेवाईकांसाठी निवासस्थाने, करमणूक केंद्रे असून रुग्णासाठी व्यायामशाळांही आहेत. नफाविरहीत तत्त्वावर औषधालय रक्तपेढी असून कोकण प्रातांत महत्त्वपूर्ण कामगिरी बजावत असून त्यांना आय.एस.ओ. प्रमाणपत्र मिळाले आहे.१) या शिवाय सदर उपक्रमाद्वारे आसपासच्या भागात फिरुन वैद्यकीय शिबीरे आयोजित करुन वेगवेगळया रुग्णांचा शोध घेऊन त्यांच्यावर मोफत उपचार केले जातात. शिवाय कुपोषित मुलांना व गर्भवती मातांना विनामुल्य सकस आहार पुरविण्यात येतो. शिवाय अलिकडे येथे हदयविकाराच्या रुग्णांना उपचार मिळू लागले आहेत. याशिवाय या ठिकाणी 'स्किल लॅब' ची उभारणी करण्यात आली आहे. या रुग्णालयाची काही खास वैशिष्टये आहेत यामध्ये फिरत्या दवाखान्याद्वारे नाममात्र दरात सेवा केली जाते. कोकणमातील एकमेव सेवा देणारे डेरवण येथील वैशिष्टयपूर्ण रुग्णालय समजले जाते. कुपोषणाचा विचार करुन मोफत सकस आहार योजना राबवल्यामुळे आसपासच्या अनेक खेडयांना याचा लाभ झाला. आरोग्याविषयक सुविधेबरोबर ज्ञानार्जनासाठी आणखीन एक पाऊल टाकले.

**इंग्रजी माध्यम शाळा:**

श्री क्षेत्र डेरवण सावर्डे परिसराकरिता नदीन इंग्रजी माध्यमाच्या बालवाडी व पूर्व प्राथमिक शाळेचा शुभारंभ झाला. सदर उपक्रमाचा विस्तार होऊन हायस्कुलपर्यंत शिक्षणाची सुविधा निर्माण झाली. चार कोटी रुपये खर्च करुन शाळेची वास्तू उभा करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबर त्यांच्या राहाणेसाठी विद्यार्थी व विद्यार्थ्यांनीसाठी स्वतंत्ररित्या वसतीगृहाची सोय केली.

**समर्थ नर्सिंग स्कूल:**

भागातील १२ वी उर्त्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांनीसाठी १ फेब्रुवारी २००९ रोजी समर्थ नर्सिंग स्कूलचा शुभारंभ झाला. या संस्थेमध्ये ANM या दोन वर्षाच्या नर्सिंग कोर्ससाठी दर वर्षी ४० विद्यार्थ्यींनींना प्रवेश दिला जातो. सदर अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर चांगल्या रुग्णालयामध्ये नोकरी मिळू शकते. शिवाय काळाची गरज ओळखून येथे Post Basis BSC Nursing व MSC नर्सिंग हे पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत. या नर्सिंग स्कूलसाठी सुमारे दोन कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. शिक्षणाबरोबर विद्यार्थीनीकरीता वसतीगृह ४५ खोल्यांचे बांधले आहे. येथे केंद्र शासनाच्या किमान कौशल्य विकास व रोजगार योजनेचे ३३ अभ्यासक्रम येथे मोफत शिकवले जातात.

**बी.के. एल. वालावलकर रुरल मेडिकल कॉलेज:**

हॉस्पिटलला सलग्न असे 'श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटेबल ट्रस्टचे बी. के. एल. वालावलकर रुरल मेडिकल कॉलेज' कासारवाडी, सावर्डा येथे शैक्षणिक वर्ष २०१५–१६ पासून सुरु झाले आहे. सदर कॉलेजमध्ये दरवर्षी शंभर विद्यार्थ्यांना एम.बी.बी.एस. या वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश दिला जातो. कॉलेजमध्ये आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. येथे वसतिगृहाची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे.

**क्रीडा–संकुल:**

ट्रस्टने आणखीन एक स्वप्न साकार केले आहे ते म्हणजे हॉस्पिटल परिसरामध्ये एक भव्य क्रिडा संकुल उभारण्यात आले आहे. सदरच्या प्रकल्पास जवळजवळ २५ कोटी खर्च करण्यात आले होते. या क्रिडा संकुलाची उभारणी करत असताना प्रत्येक खेळासाठी आंतरराष्ट्रीय मानदंडाप्रमाणे सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. कोकणातून प्रतिभावान खेळाडू निवडून त्यांना राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्पर्धासाठी तयार करणे हा या प्रकल्पाला उद्देश आहे. दरवर्षी येथे श्रीशिवजयंतीच्या निमित्ताने भव्य क्रिडा स्पर्धेचे आयोजन केले जाते. विशेष म्हणजे सन २०१८ मध्ये ईषा पवार हिने 'धनुर्विद्या प्रकारात सुवर्णपदक मिळाले असून तिला आठ वर्षासाठी प्रतिवर्षी पाच लाखांची शिष्यवृत्ती मिळवण्या यश मिळाले होते.

**समारोप:**

रत्नागिरी जिल्हयामध्ये गोवा–मुंबई राष्ट्रीय महामार्गावरील सावर्डे गावापासून थोडेसे आत व पूर्वेस चार कि.मी. अंतरावरती चिपळूण तालुक्यातील अगदी छोटेसे डेरवण गाव आहे. येथे जवळजवळ एक कोटी रुपये खर्च करुन श्री सीतारामबुवा वालावलकर ट्रस्टतर्फे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनामधील महत्वपूर्ण अशा प्रसंगाचे दर्शन घडवणारी 'शिवसृष्टी' निर्माण केली आहे. या परिसराला शिवसमर्थगड असेही संबोधले जाते. या ट्रस्टने शिवसृष्टी व आरोग्य व शिक्षण क्षेत्रामध्ये उत्कृष्ट व दैदिप्यमान अशी कामगिरी बजावलेली आहे. या समुहाला अनेक शिक्षणप्रेमी व इतर मंडळी तसेच देश विदेशातून हजारो पर्यटक येथे भेटी देतात. त्यामुळे या स्थानास पर्यटन नकाशावर महत्वाचे स्थान मिळाले आहे. थोडक्यात या स्थानाचे कार्य हे समाजाला दिपस्तंभासारखे दिशादर्शक ठरेल.

**संदर्भ :**

१. श्री सद्गुरु सहजानंद सरस्वती महाराज निर्मित श्रीशिव–समर्थगड आणि श्री शिव–समर्थ मंदिर श्री क्षेत्र डेरवण, पुणे २०१०, पृ. ५.
२. घाणेकर प्र. के.– कोकणातील पर्यटन, स्नेह प्रकाशन, पुणे १९९९, पृ. ९१.
३. डॉ. देशमुख श. बा.– महाराष्ट्र पर्यटन (कोकण), देशमुख प्रकाशन, कोल्हापूर, २०१६, पृ.६४.
४. श्री सद्गुरु सहजानंद सरस्वती महाराज निर्मित– उपरोक्त पृ. ५.
५. डॉ. देशमुख श. बा.– उपरोक्त.
६. उपरोक्त पृ. ६५.
७. श्री सद्गुरु सहजानंद सरस्वती महाराज निर्मित –उपरोक्त पृ. ५१.